**जिल्हा परिषद जालना,आरोग्य विभाग अंतर्गत आरोग्य सेवक (पुरुष)50%/40%भरती प्रक्रियासंदर्भात प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने दिनांक 01/08/2025 रोजी कै.यशवंतराव चव्हाण सभागृह जि.प.जालना येथे तक्रार निवारण समिती बैठकीचे इतिवृत्तांत.**

मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, यांच्या आदेशानुसार दिनांक ०१/०८/२०२५ रोजी जालना जिल्हा परिषदेच्या कै.यशवंतराव चव्हाण सभागृहात आरोग्य सेवक (पुरुष) ५०%/४०% या कोटयातील सरळसेवा भरती प्रक्रियेबाबत प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने चौकशी करण्यासाठी मा.मुख्य लेखा व वित्त अधिकारी जि.प.जालना यांच्या अध्यक्षतेखाली तक्रार निवारण समितीची बैठक आयोजित करण्यात आली.

सदरील बैठकीत मा.प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामिण विकास यंत्राणा जालना, मा.कोमल कोरे, प्रभारी उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सा), मा.डॉ.जयश्री भुसारे, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.गजानन म्हस्के, सहाय्यक जिल्हा आरोग्य अधिकारी, डॉ.एन.जी.पवार साथरोग वैद्यकीय अधिकारी सर्व तक्रारदार व पत्रकार हे उपस्थित होते. प्रथम मा.मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांनी तक्रारदारांना आपली कोणत्या पदासाठी आक्षेप आहे असे विचाले, आपले आक्षेप तक्रारीतील मुद्दे आमच्याकडे सादर करावे अशा सुचना देण्यात आल्या, यानुसार तक्रारदाराचे निवेदन मुद्दे निहाय खालील प्रमाणे.

| अ.क्र. | तक्रारदार यांचे नांव | तक्रार/मुद्दे | प्रशासनाचे स्पष्टीकरण |
|---|---|---|---|
| १. | श्री.अविनाश नागुरे,<br>श्री.गणेश केदाकुंटे,<br>श्री.हनुमान मात्रे,<br>श्री.सिध्देश्वर गाडेकर | हंगामी फवारणी कर्मचारी अनुभव धारक उमेदवारांचे प्रमाणपत्र पडताळणी न करता त्यांना नेमणुक आदेश देण्यात आले. | हंगामी फवारणी कर्मचारी अनुभव धारक १६ उमेदवारांना मा.उच्च न्यायालयाने रिट याचिका क्र.१२८४२/२०२४ आदेशान्वये खारीज (Dismissed) केली असल्याने शासनाचे पत्र दिनांक १२/०३/२०२५ नुसार तत्कालीन नियुक्ती प्राधिकारी यांनी अनुभव प्रमाणपत्र पडताळणीच्या अधिन राहून नियुक्ती आदेश देण्यात आले. संबधिताचे अनुभव प्रमाणपत्र ०९/०४/२०२५ रोजी जिल्हा हिवताप अधिकारी कार्यालय गडचिरोली, अहिल्यानगर,बीड, पुणे,रायगड,नांदेड, यांना अनुभव प्रमाणपत्र पडताळणीसाठी पाठविण्यात आले. यानुसार जिल्हा हिवताप अधिकारी कार्यालय अहिल्यानगर, बीड, गडचिरोली यांचे अहवाल प्राप्त झाले असून पुणे जिल्हा हिवताप कार्यालय यांचे अहवाल अद्याप प्राप्त झालेले नाही. |
| २. | श्री.अविनाश नागुरे,<br>श्री.गणेश केदाकुंटे, | श्री.सचिन नामदेवराव निकम, श्री.सुरेश देवराव सांगळे, श्री.अशोक हनुमंत नैराळे, श्री.महेश मुकुंद वाघ, सर्व अहिल्यानगर. श्री.अमोल बंडू राठोड, श्री.अजय शरद राठोड,श्री.दिपक सुधाकर सानप, बिड व श्री.संदिप संजय काळे पुणे. या उमेदवारांचे त्यांच्या हिवताप अधिकारी कार्यालयाच्या जेष्ठता यादीमध्ये नांव नमुद नाही तरी सुध्दा संबधित हिवताप अधिकारी कार्यालयाने त्यांचे प्रमाणपत्र दिले आहे. | **जिल्हा हिवताप अधिकारी कार्यालय अहिल्यानगर यांचेकडील दिनांक ०१/०१/२०२५ च्या जेष्ठता सुचीमध्ये खालील अ.क्र. ०१ ते ०४ वरील उमेदवारांचे नांव समाविष्ट आहे.**<br>१) श्री.सचिन नामदेवराव निकम हे अद्याप नियुक्तीच्या ठिकाणी हजर झालेले नाही.<br>२) श्री.सुरेश देवराव सांगळे, यांचे जेष्ठता यादीतील अ.क्र.१८८ वर आहे.<br>३) श्री.अशोक हनुमंत नैराळे यांचे नांव अ.क्र.१९२ वर आहे.<br>४) श्री.महेश मुकुंद वाघ यांचे नांव अ.क्र.१८७ वर आहे.<br>**जिल्हा हिवताप अधिकारी कार्यालय बिड यांचे कडून प्राप्त अहवालानुसार खालील अ.क्र. ०५ ते ०७ वरील उमेदवारांचे नांव जेष्ठता सुचीमध्ये समाविष्ट आहे.**<br>५) श्री.अमोल बंडू राठोड यांचे जेष्ठता सुचीतील अ.क्र.२५५ वर आहे.<br>६) श्री.अजय शरद राठोड यांचे नांव अ.क्र.४०६ नमुद असून ते अद्याप हजर झालेले नाही.<br>७) श्री.दिपक सुधाकर सानप यांचे नांव ४२० वर आहे.<br>**व जिल्हा हिवताप अधिकारी कार्यालय पुणे** |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | यांच्याकडून अ.क्र. ०८ व ०९ वरील उमेदवारांचा अहवाल अद्याप प्राप्त झालेला नाही.<br>८) श्री.संदिप संजय काळे<br>९) श्री.संदिप चांगदेव गाढे<br>तक्रारदाराच्या आक्षेपानुसार समक्ष जेष्ठता सुची दर्शविण्यात आली. |
| ३. | श्री.अविनाश नागुरे, श्री.गणेश केदाकुंटे, | श्री.सचिन नामदेवराव निकम यांची जन्म दिनांक १६/१०/१९८९, श्री.सुरेश देवराव सांगळे दिनांक १३/०२/१९९१, श्री.अशोक हनुमंत नैराळे दिनांक ०७/०६/१९९२, श्री.महेश मुकुंद वाघ दिनांक १५/१२/१९९१, श्री.अमोल बंडू राठोड, दिनांक ०३/०९/१९९९, श्री.अजय शरद राठोड दिनांक १०/०५/१९९९, श्री.दिपक सुधाकर सानप दिनांक २०/१२/१९९८ श्री.संदिप संजय काळे दिनांक २५/०२/१९९७, या उमेदवारांचे जन्म तारीख पडताळणी करुन नेमणुकीची तारीख तपासावी. १८ वर्ष पुर्ण होण्यापूर्वीच आदेश देण्यात आल्याचे सांगीतले. | १) श्री.सचिन नामदेवराव निकम यांची जन्म दि. १६/१०/१९८९,<br>२) श्री.सुरेश देवराव सांगळे दिनांक१३/०२/१९९१,<br>३) श्री.अशोक हनुमंत नैराळे दि. ०७/०६/१९९२,<br>४) श्री.महेश मुकुंद वाघ दिनांक १५/१२/१९९१,<br>५) श्री.अमोल बंडू राठोड, दिनांक ०३/०९/१९९९,<br>६) श्री.अजय शरद राठोड दिनांक १०/०५/१९९९,<br>७) श्री.दिपक सुधाकर सानप दिनांक २०/१२/१९९८<br>८) श्री.संदिप संजय काळे दिनांक २५/०२/१९९७, या उमेदवारांचे जन्म तारीख त्यांचे मुळ प्रमाणपत्रावरुन पडताळणी करुन ती खरी असल्याचे तक्रारदारास दर्शविण्यात आले. त्यांच्या नेमणुकीची तारीख आणि जन्म तारीख यामधील अंतर १८ वर्षापेक्षा जास्त आहे. |
| ४. | श्री.अविनाश नागुरे, श्री.गणेश केदाकुंटे, श्री.हनुमान मात्रे, श्री.सिध्देश्वर गाडेकर श्री.सिध्दार्थ चव्हाण, श्री.अरविंद राठोड श्री.गोविंद हरकळ | खुल्या प्रवर्गातील प्रतिक्षा यादी चुकीची लावण्यात आली. | खुल्या प्रवर्गातील प्रतिक्षा यादी सुधारीत करण्यात आली असून तक्रारदारास दर्शविण्यात आली. |
| ५. | | माजी सैनिकासाठी रिक्त असलेल्या जागा गुणवत्ताधारकांमधून भरण्यात यावी. | माजी सैनिकासाठी रिक्त असलेल्या जागा ग्राम विकास विभागाचे पत्र दिनांक ११/१२/२०२४ प्रमाणे व शासन निर्णयातील विहित तरतुदीनुसार कार्यवाही करण्यात येईल असे तक्रारदारांस सांगितले. |
| ६. | | ग्राम विकास विभागाचे पत्र दिनांक ११/१२/२०२४ प्रमाणे कारवाई करावी. | माजी सैनिकासाठी रिक्त असलेल्या जागा ग्राम विकास विभागाचे पत्र दिनांक ११/१२/२०२४ प्रमाणे व शासन निर्णयातील विहित तरतुदीनुसार कार्यवाही करण्यात येईल असे तक्रारदारांस सांगितले. |
| ७. | श्री.सिध्दार्थ लक्ष्मणराव देवके | श्री.सिध्दार्थ लक्ष्मणराव देवके यांनी आरोग्य सेवक (पु)५०% साठी फॉर्म भरला होता व परिक्षेमध्ये १३६ गुण प्राप्त झाले असून अनु.जातीमध्ये ११ जागेसाठी केवळ दोन उमेदवार प्रतिक्षायादीमध्ये घेण्यात आले. माझे नांव घेण्यात आले नाही. | श्री.सिध्दार्थ लक्ष्मणराव देवके यांनी केलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने आरोग्य सेवक (पु) ५०% मध्ये अनु.जातीसाठी जाहिरातीनुसार सर्वसाधारण ९ पदे असून त्यानुसार महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय दिनांक ०४/०५/२०२२ नुसार रिक्त पदे अधिक रिक्त पदाच्या ५०% किंवा १० यापैकी जे अधिक असेल या प्रमाणे उमेदवारांना बोलविण्यात येते. यानुसार एकुण १४ उमेदवारांना बोलाविण्यात येवून अ.क्र.१५० वरील उमेदवारांपर्यंत बोलविण्यात आलेले आहे. संबधिताचे नांव हे अ.क्र.१६३ वर असून शासन निर्णयानुसार पुरेसे उमेदवार उपलब्ध झाल्यामुळे संबधिताचे नांवाचा निवडसुचीमध्ये समाविष्ट करण्यात आलेला नाही. |

| | | | |
|---|---|---|---|
| ८. | श्री.मुरलीधर महादेव वाघ | श्री.मुरलीधर महादेव वाघ यांनी खुला प्रकल्पग्रस्त प्रतिक्षा यादीवरील उमेदवाराची संख्या वाढविण्याची विनंती केली आहे. | श्री.मुरलीधर महादेव वाघ यांनी केलेल्या विनंतीच्या अनुषंगाने महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय दिनांक ०४/०५/२०२२ नुसार रिक्त पदे अधिक रिक्त पदाच्या ५०% प्रतिक्षा सुचीमधे नांवे समाविष्ट करण्यात आली. खुला प्रकल्पग्रस्तासाठी २ जागा असून त्यासाठी तीन उमेदवारा बोलविण्यात आले असून १) श्री.रामेश्वर कौतीक शेळके गुण १६० निवड-१, २) श्री.रविंद्र कृष्णा कोल्हे गुण-१४८ निवड-२ ३) श्री.आनंता केशव घुले गुण १४४ प्रतिक्षा-१ अशी सुची असून श्री.मुरलीधर माहोदव वाघ यांना १२८ गुण असून EWS प्रकल्पग्रस्त सुचीमध्ये प्रतिक्षा यादीवर अ.क्र.१ वर आहे. खुला प्रवर्गातील २ जागेसाठी निवड झालेले उमेदवार हजर झालेले असल्याने भविष्यात प्रतिक्षा सुचीच्या कालमर्यादेमध्ये सदर पद रिक्त झाल्यास शासन नियमानुसार गणवत्तेच्या आधारे प्रतिक्षावरील उमेदवाराचा विचार करण्यात येईल. |
| ९. | श्री.स्वप्निल विकास शिंदे, श्री.रंगनाथ दत्ता बरकुले, श्री.प्रविण तेजराव वानखेडे, श्री.दिपक दादाराव सुरासे, | ४०% भरतीमध्ये ज्या उमेदवारांनी राजीनामा दिलेला आहे त्यांच्या जागी प्रतिक्षा उमेदवारांना नियुक्ती देण्याबाबत प्रतिक्षा वरील उमेदवारांनी विनंती केलेली आहे. | ४०% भरतीमध्ये नियुक्ती दिलेल्या ०८ उमेदवारांनी राजीनामा दिल्यामुळे सदर राजीनामा जुलै-२५ या महिण्यात मंजूर झालेला असल्यामुळे रिक्त झालेल्या जागेवर नियमानुसार प्रतिक्षा यादीतील उमेदवारांनी नियुक्ती देण्याबाबत कार्यवाही करण्यात येईल असे सांगण्यात आले. |

हंगामी फवारणी कर्मचारी बाबत तक्रारदारांच्या प्रश्नाच्या अनुषंगाने सह संचालक, आरोग्य सेवा (हत्तीरोग व जलजन्य रोग) यांचे पत्र दिनांक ०६/०७/२०१३ मधील मार्गदर्शक सुचनानुसार प्राप्त अहवालामधील त्रुटीची पुर्तता करणेबाबत जिल्हा हिवताप अधिकारी कार्यालय गडचिरोली,अहिल्यानगर, बीड, पुणे यांना या कार्यालयाचे पत्र क्र.१७५८,१७५९,१७६०,१७६१, दिनांक १७/०७/२०२५ नुसार कळविण्यात आले असल्याचे निदर्शनास आणून देण्यात आले. जोपर्यंत परिपुर्ण अहवाल प्राप्त होत नाही तोपर्यंत संबंधितास योग्यता प्रमाणपत्र देण्यात येणार नसल्याची बाब नमुद करण्यात आली.

वरील प्रमाणे आलेल्या तक्रारदाराची तक्रार ऐकून घेवून निराकरण करण्यात आले असून सदर प्रकरणाची व्हीडीओ चित्रीकरण करण्यात आलेले आहे. उपस्थित तक्रारदार यांच्या विषयानुसार शासन निर्णय/मार्गदर्शक सुचना यांची पडताळणी /खात्री करुन अंतीम निर्णय/कार्यवाही दिनांक ३१/०८/२०२५ पर्यंत करण्यात येईल. असे सांगून बैठक समाप्त करण्यात आली.

डॉ.एन.जी.पवार
साथरोग वैद्यकिय अधिकारी
जिल्हा परिषद जालना

डॉ.जी.डी.म्हस्के
सहाय्यक जिल्हा आरोग्य अधिकारी
जिल्हा परिषद जालना

डॉ.जयश्री भुसारे
जिल्हा आरोग्य अधिकारी
जिल्हा परिषद जालना

कोमल कोरे-चाटे
उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सा)
जिल्हा परिषद जालना

राजू सोळुंके
मुख्य लेखा व वित्त अधिकारी
जिल्हा परिषद जालना